# आदेश

क्र.कावि/कक्ष7:2/प्रअभूसं/न.क्र.102/कावि-/ 1667-31 /2020
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक- 08/09/2020

विषय :- भूसंपादन प्रकरण क्रमांक ३३/२००८-०९ मौज टाका ता.नांदुरा जि.बुलडाणा(बुडीत शेती) या प्रकरणामध्ये मध्ये भुमी संपादन व पुनर्वसन करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम २५ चे परंतुक प्रमाणे अंतिम निवाडयाकरीता मुदतवाढ मिळणेबाबत.

संदर्भ:- उपजिल्हाधिकारी भूसंपादन मध्यम प्रकल्प बुलडाणा यांचे पत्र क्र.कावि/उपभुस/म.प्र./क.लि./३२७/२०२० दिनांक २७-०८-२०२०.

*****

ज्या अर्थी उपजिल्हाधिकारी भूसंपादन मध्यम प्रकल्प बुलडाणा यांनी त्यांच्या संदर्भीय पत्रानुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक ३३/२००८-०९ मौज टाका ता.नांदुरा जि.बुलडाणा(बुडीत शेती) या प्रकरणामध्ये मध्ये भुमी संपादन व पुनर्वसन करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम २५ चे परंतुक प्रमाणे अंतिम निवाडयाकरीता मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

सदर प्रकरणामध्ये कलम१९ ची उदघोषणा ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीसबोर्डावर दिनांक १६-०९-२०१९ रोजी प्रसिध्दी झालेली आहे. सबब अंतिम निवाडा हा १५-०९-२०२० पर्यंत जाहीर होणे आवश्यक आहे.सदर प्रकरणात अद्यापपर्यंत यंत्रणा-कार्यकारी अभियंता,जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग शेगांव यांना वारंवार निधी मागणी करुनसुध्दा त्यांनी संपूर्ण निधीचा भरणा केलेला नाही. तसेच सदर प्रकरणात कलम २१ वरील चौकशीचा अहवाल , वनझाडे तसेच मालमत्तेचे मुल्यांकन अप्राप्त आहे.

कार्यकारी अभियंता,जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग,शेगांव यांनी त्यांचे पत्र दिनांक २१-०८-२०२० पत्रान्वये प्रकरणात आवश्यक निधीबाबत प्रचलित पध्दतीने निधी मागणी वरीष्ठ कार्यालयास नोदविण्यात आली असून निधी प्राप्त होताच तातडीने समायोजन करण्यात येईल. सद्यास्थितीत कोविड-१९ मुळे लॉकडाऊनची परिस्थिती लक्षत घेता उपरोक्त भूसंपादन प्रकरण व्यपगत न होऊ देता निवाडयाकरीता मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

उपजिल्हाधिकारी भूसंपादन मध्यम प्रकल्प बुलडाणा यांनी उक्त प्रकरणात व्यपगत दिनांकापूर्वी अंतिम निवाडा घोषीत न झाल्यास सदर प्रकरणातील भूसंपादनाची संपूर्ण प्रक्रीया व्यपगत होईल. सबब सदर प्रकरणात भुमी संपादन व पुनर्वसन करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम २५ चे परंतुक प्रमाणे अंतिम निवाडा घोषीत करण्यासाठी १२ महीने (बारा महीने) एवढी मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 25 मध्ये जिल्हाधिकारी,कलम 19 अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून बारा महिन्याच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल.

परंतु,त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल.

परंतु आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय,लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल.अशी तरतूद आहे.

तरी भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे नियम २५ नुसार भुसंपादन प्रकरण क्रमांक ३३/२००८-०९ मौजे टाका ता.नांदुरा जि.बुलडाणा(बुडीत शेती) या प्रकरणात अंतिम निवाडा करण्यास बारा महीन्याची <u>मुदतवाढ</u> देण्यांत येत आहे.

जिल्हाधिकारी बुलडाणा